**L. A. BILL No. XLVI OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६.

## महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६.

२०२३ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ प्रख्यापित केला होता ;



एचबी २१६१–१

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात त्यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये,– २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मधील, खंड (छ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :–

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागण्याकरिता अर्ज करण्याचे, अधिष्ठाता मंडळाद्वारे अर्जाची छाननी करण्याचे व ते राज्य शासनाकडे पाठविण्याचे आणि राज्य शासनाकडून इरादापत्र देण्याचे दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) यामध्ये निर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :—

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (ग) | ज्या वर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी | ३१ डिसेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी ; |
| (घ) | विद्यापीठाच्या शिफारशीनंतर, लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी | १५ फेब्रुवारी २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी."; |

(२) पोट-कलम (४) मधील, खंड (घ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, २०२४- २०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता राज्य शासनाकडे अर्ज करण्याचा दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला दिवस हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिवस | २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी | १५ नोव्हेंबर २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी.". |

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यास जोडलेल्या अनुसूची क ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची क मधील भाग एक मध्ये, अनुक्रमांक ४ येथील नोंदीमध्ये,—

(१) स्तंभ (१) मधील, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) स्तंभ (२) मधील,—

(एक) नोंद (१) मधील, "औरंगाबाद" या मजकुराऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) नोंद (४) मधील, "उस्मानाबाद" या मजकुराऐवजी, "धाराशिव" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०२३ चा १० महा. अध्या. ८.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ च्या पोट-कलम (३) मध्ये, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र देण्याकरिता अर्ज करण्यासाठी, शासनाद्वारे इरादा पत्र देण्यासाठी, छाननी केल्यानंतर विद्यापीठाद्वारे अनुपालन अहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आणि नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याकरिता अंतिम मान्यता देण्यासाठी कालमर्यादांची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (४) मध्ये, नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी राज्य शासनाकडून परवानगी देण्यासाठी कालमर्यादेची तरतूद केली आहे.

**२.** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय, नवीन पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्याच्या परवानगीसाठी विद्यापीठांना प्रस्ताव सादर करण्याकरिता, विविध विद्यापीठांच्या सम्यक आराखड्यांना अंतिमरूप दिल्यानंतर, सलग सुट्ट्यांमुळे पुरेसा वेळ उपलब्ध नव्हता याबाबत शासनाला विविध निवेदने प्राप्त झाली होती. नवीन महाविद्यालय, पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचे आणि त्यानंतरच्या प्रक्रिया करण्यासाठी दिनांक वाढविण्याच्या विनंत्या, अशा निवेदनांमध्ये अंतर्भूत होत्या.

म्हणून, २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन महाविद्यालय, पाठ्यक्रम, इत्यादी सुरू करण्यासाठी अर्ज करण्याकरिता, अधिष्ठाता मंडळाद्वारे अशा अर्जाची छाननी करण्यासाठी व ते राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्यासाठी नवीन वेळापत्रक विनिर्दिष्ट करणे इष्ट आहे असे वाटले.

**३.** महाराष्ट्र शासनाने, अनुक्रमे, 'औरंगाबाद' व 'उस्मानाबाद' या महसुली क्षेत्रांच्या नावांमध्ये केलेला बदल विचारात घेऊन, उक्त अधिनियमाच्या अनुसूची क च्या भाग-एक मध्ये अंतर्भूत असलेल्या, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद" या नावाऐवजी, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" हे नाव आणि "औरंगाबाद" व "उस्मानाबाद" या जिल्ह्यांच्या संदर्भाऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" व "धाराशिव" हे संदर्भ दाखल करणे देखील इष्ट आहे असे वाटले.

**४.** वरील प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या उक्त कलम १०९ मध्ये व अनुसूची क मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटले.

**५.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ (२०२३ चा महा. अध्या. ८) प्रख्यापित केला होता.

**६.** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **चंद्रकांत (दादा) पाटील,**

दिनांक १ नोव्हेंबर, २०२३. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## सन २०२३ चे वि. स. विधेयक क्रमंक ४६- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट

## (महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यातील उतारे)
## (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६)

**१.** ते **१०८** * * * *

**१०९.** (१) व (२) * * * * नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी सुरू करण्यासाठी परवानगी देण्याची पद्धत.

(३) (क) ते (४) * * * *

(छ) खंड (च) खालील विद्यापीठाचा अहवाल विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय तरतुदी, आणि इतर संबद्ध घटक, नवीन परिसंस्था चालू करण्याची परवानगी मागणा-या व्यवस्थापनाची योग्यता इत्यादी लक्षात घेऊन, राज्य शासन, आपल्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार, त्यास योग्य आणि उचित वाटेल त्याप्रमाणे अशा व्यवस्थापनास अंतिम मंजूरी देऊ शकेल. या खंडाखालील अंतिम मंजुरी ही, असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था चालू करण्याच्या प्रस्तावित वर्षाच्या १५ जून रोजी किंवी त्यापूर्वी देण्यात येईल. अशी मान्यता राज्य शासनाकडून विद्यापीठाला कळविण्यात यईल. त्यानंतर दिलेल्या मान्यता ह्या, विद्यापीठाकडून केवळ त्यानंतरच्या शैक्षणिक वर्षातच अंमलात आणल्या जातील :

परंतु, तसेच अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून, राज्य शासनास, विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अनुपालन अहवालास मान्यता देता येईल.

परंतु आणखी असे की, २०२३ - २०२४ या शैक्षणिक वर्षासाठी, उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी इरादा पत्र मागवण्यासाठी अर्ज करण्याचे, अधिष्ठाता मंडळाकडून अर्जाची छाननी करण्याचे व राज्य शासनाकडे पाठविण्याचे आणि राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचे दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) व (घ) मध्ये निर्दिष्ट केलेले दिवस किंवा दिनांक हे, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे दिवस किंवा दिनांक म्हणून वाचण्यात येतील :—

**तक्ता**

| खंड | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेले दिवस किंवा दिनांक | २०२३ - २४ या शैक्षणिक वर्षासाठी तरतुद केलेले दिवस किंवा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (क) | ज्यावर्षी इरादा पत्र मागवले असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | १५ जानेवारी २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (ग) | ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी. | २८ फेब्रुवारी २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी. |
| (घ) | विद्यापीठाच्या शिफारशीनंतर लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी. | १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी.”; |

(४) (क) ते (४)(ग) * * * *

(घ) विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासनास, इतर संबद्ध घटक, राज्य शासनाची अर्थसंकल्पीय तरतूद, इतर संबद्ध घटक, परवानगी मागणा-या व्यवस्थापनाची योग्यता, इत्यादी बाबी विचारात घेऊन, त्याच्या पूर्ण विवेकानुसार त्याला योग्य व उचित वाटतील अशा परिसंस्थांना त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी परवानगी देता येईल :

परंतु असे असले तरी, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जाच्या बाबतीत, राज्य शासनास, कारणे लेखी नमूद करून मान्यता देता येईल.

परंतु आणखी असे की, दिनांक २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षासाठी, नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगी मागण्याचा अर्ज करण्याचा दिनांक वाढविण्याच्या दृष्टीने, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला दिवस किंवा दिनांक हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे दिवस किंवा दिनांक म्हणून वाचण्यात येईल :—

**तक्ता**

| खंड<br>(१) | विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेले दिवस किंवा दिनांक<br>(२) | २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी तरतुद केलेला दिवस किंवा दिनांक<br>(३) |
|---|---|---|
| (क) | ज्यावर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी. | १५ जानेवारी २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी. |

(५) ते (९) * * * *

**११०. ते १४८** * * * *

**अनुसूची क**

**भाग एक**

| | विद्यापीठाचे नाव<br>(१) | विद्यापीठ क्षेत्र<br>(२) |
|---|---|---|
| १. ते ३ * * | * | * |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ. औरंगाबाद. | जिल्हे<br>(१) औरंगाबाद<br>(२) जालना<br>(३) बीड<br>(४) उस्मानाबाद |

५. ते ११ * * * *

**अनुसूची ख**

**भाग एक व दोन** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६. ]**

**[ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. ]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर